दैनिक
# सांगोला सुपरफास्ट
सर्वसामान्यांच्या हक्काचे व्यासपीठ
संपादक : डॉ. वैभव जांगळे
(९९२१४०४०९५)
Reg. No. MAHMAR48569 Email : dailysangolasuperfast@gmail.com
✦ वर्ष : ४ थे ✦ ✦ अंक : ९५ वा ✦ ✦ बुधवार दि.१९ जुलै २०२३ ✦ ✦ मुल्य २.०० रू. ✦ ✦ पाने: ४ ✦

हृदयरोग महिन्याचा चौथा रविवार
डॉ.कुलदिप कोलपाकवार
M.D., D.M.
(कार्डिओलॉजी)
हार्ट अटॅक, छातीत दुखणे,
छातीत धडधडणे, उच्चरक्तदाब इ.

सांगोला वेलफेअर असोसिएट संचलित
स्पंदन
मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
जुना मेडशिंगी रोड, वाढेगांव नाका, सांगोला
मो. 8862050235, 8862050238

महिन्याचा चौथा रविवार मेंदू व मणका
डॉ.प्रविण वायकुळे
M.S.M.Ch.(न्युरोसर्जन)
मेंदूविकार, मेंदू व मणका शस्त्रक्रिया तज्ञ
डोके दुखी, पाठदुखी, कंबर दुखी,
मान दुखणे, ब्रेन ट्युमर, झटके येणे,
अपघातात मेंदूला झालेली इजा, अर्धांगवायू इ.

## मातोश्री गिरीजाबाई ढोबळे माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी मोहम्मद शाझ सर्फराज खतीब ब्रेवरी अबॅकस स्पर्धेत जिल्हयात प्रथम



सांगोला (प्रतिनिधी):– सोलापुर येथे ब्रेवरी अबॅकस आयोजित सोलापुर जिल्हास्तरीय ब्रेवरी अबॅकस स्पर्धा दिनांक १६ जुलै २०२३ रोजी पार पडली. या स्पर्धेमध्ये ब्रेवरी अबॅकस सांगोला शाखेचे विदयार्थी मोहम्मद शाझ सर्फ राज खतीब इयत्ता ६ वी याने फस्ट लेव्हल मधुन प्रथम क्रमांक मिळविला. या स्पर्धेत फर्स्ट लेव्हल या वयोगटामध्ये मोहम्मद शाझ इयत्ता ६ वी याने एकाग्रता व अचुकता या जोरावर प्रथम क्रमांक मिळविला. ख

सदर स्पर्धेमध्ये सहभागी विदयार्थ्याना लाईव्ह प्रश्न विचारत त्यांच्यातील गणितीय आकडेमोडे कौशल्याची तपासणी करण्यात आली. फर्स्ट लेव्हलमध्ये असणा–या जवळपास ३४ सुत्राच्या आधारे तोंडी पध्दतीने गणितीय आकडेमोडे अचुकपणे करून शाझने प्रथम क्रमांक मिळविला तर याच विदयालयातील आरा सर्फराज खतीब या विदयार्थीनीने ज्युनिअर लेव्हलमध्ये जिल्हयात ८ वा क्रमांक मिळविला. सदर स्पर्धे चा बक्षीस वितरण सोहळा सोलापुर येथे सुरभी हॉलमध्ये पार पडला.सदर स्पर्धेसाठी ब्रेव्हरी अबॅकस सांगोला शाखेचे प्रमुख श्री. गणेश मेटकरी सर यांचे मार्गदर्शन लाभले. यामुळे दोन्ही विदयार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. विद्यालयातील मुलांच्या यशाबददल संस्थापक अध्यक्ष मा. लक्ष्मणराव ढोबळे सर यांनी तसेच संस्था सचिव मा. श्री. सिद्राम जावीरसाहेब यांनी अभिनंदन व कौतुक केले. विदयालायात आयोजित सत्कार समारंभाला आपल्या मनोगतातुन मोहम्मद शाझ याने मार्गदर्शक श्री. गणेश मेटकरी सर तसेच विदयालयातील सर्व शिक्षकांचे मनापासुन आभार मानले .

विद्यालयात असे विविध उपक्रम राबवुन विदयार्थ्यांच्या शैक्षणिक व बौध्दिक विकासात भर टाकावी अशा सुचना संस्था प्रशासन अधिकारी सौ. कांतीताई अब्राहम् आवळे यांनी केली

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वतीने सांगोला तहसील कार्यालयासमोर जोडो मारो आंदोलन संपन्न



सांगोला (प्रतिनिधी)– भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी महिलांशी छळवणूक करून लैंगिक शोषण केले चा व्हिडिओ सर्वत्र प्रसिद्ध झालेला आहे. त्याचे पडसाद चालू असलेल्या पावसाळी अधिवेशनात उमटलेले दिसून येत आहेत.

त्याच्या निषेधार्थ सांगोला तहसील कार्यालयासमोर मंगळवार दिनांक १८ जुलै २०२३ रोजी २ वाजता किरीट सोमय्या यांच्या फोटोस जोडो मारो आंदोलन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वतीने करण्यात आले.

या आंदोलनाचे निवेदन सांगोला तहसील कार्यालयाचे तहसीलदार संजय खडतरे यांना देण्यात आले यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तालुकाप्रमुख सूर्यकांत नाना घाडगे, शहर प्रमुख कम्रद्दीन खतीब, उप तालुकाप्रमुख अरविंद पाटील, नव्याने शिवसेनेत प्रवेश केलेले हरिभाऊ पाटील, शिवसेना उपविभाग प्रमुख रघुनाथ ऐवळे, तुषार इंगळे, चिंचोली गावचे माजी सरपंच कृष्णा बेहेरे, अनिल बेहेरे, व असंख्य शिवसैनिक उपस्थित होते या आंदोलनाच्या निषेधार्थ हरिभाऊ पाटील सूर्यकांत नाना घाडगे यांनी मनोगत व्यक्त केले.

## शहरातील रस्त्याची दुरावस्था सांगोला नगरपालिका याकडे लक्ष देणार आहे का नाही



सांगोला (प्रतिनिधी):– शहरातील सर्व मार्गावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत काही ठिकाणी रस्ता उखडलेला आहे पावसाळ्यात रहदारीसाठी नागरिकांना मोठा त्रास घ्यावा लागत आहे सध्या नगरपालिकेतील अधिकारी वर्ग याकडे लक्ष देणार आहे असा प्रश्न सर्वसामान्य सांगोला वासियांना पडला आहे प्रशासनामध्ये गुंठेवारी प्रकरण बांधकाम परवाने वापर परवाने एनओसी दाखले याकडे त्यांचे लक्ष आहे नागरिकांच्या प्रचंड तक्रारी येत आहेत आर्थिक देवाण–घेवानाची चर्चा शहरभर चर्चिली जात आहे हे अतिशय दुर्दैवी लोकशाहीला मारक आहे काही ठराविक लोकांचीच कामे होतात सर्व सामान्य नागरिकांना सतत हेलपाटे घालावे लागत आहेत

पावसाळा सुरू झाला आहे माननीय मुख्याधिकारी यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन शहरातील प्रमुख मार्गावरील खड्डे डांबराने भरून घ्यावेत व प्रलंबित सार्वजनिक लोकहिताच्या कामाकडे अधिकचे लक्ष द्यावे शहरालगतच्या हद्द वाढ भाग तसेच लगतच्या वाड्या वस्तीवरील काही रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे तरी प्रशासनाने वाड्या वस्तीवर आवश्यक त्या ठिकाणी मुरूम टाकून घ्यावा व शहरातील रस्ते वरील खड्डे डांबराने मुजवून घ्यावेत अशी शहरवासीयांच्या वतीने विनंती..

भुयारी गटारी योजनेच्या नावाखाली शहरातील सर्व रस्त्यांची अत्यंत दयनीय दुर्दशा पावसाळ्यात काही लहान मोठे अपघात होण्यापूर्वी प्रशासनाने गांभीर्याने मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजवून घ्यावेत

## फॅबटेक पब्लिक स्कूलचा स्टुडंट कौन्सिलचा पदग्रहण व शपथविधी समारोह संपन्न




सांगोला (प्रतिनिधी):– फॅबटेक पब्लिक स्कूल न्ड ज्युनिअर कॉलेज मध्ये स्टुडंट पदग्रहण व शपथविधी समारोह संपन्न झाला.शालेय शिस्त टिकवण्यासाठी व शाळेतील गुणवत्ता वाढविण्यासाठी, राष्ट्राच्या सक्षमीकरणासाठी तसेच पर्यावरणाच्या संरक्षणासाठी शालेय जीवनात नेतृत्वगुण आणि जबाबदारीची जाणीव व्हावी म्हणून फॅबटेक पब्लिक स्कूल मध्ये शैक्षणिक वर्ष २०२३–२४ चा स्टुडंट कौन्सिलचा पदग्रहण व शपथविधी सोहळा आयोजित करण्यात आला होता . या कार्यक्रमासाठी सांगोला पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक श्री.अनंत कुलकर्णी, सकाळ वर्तमानपत्राचे रिपोर्टर श्री. दत्तात्रय खंडागळे, कॅम्पस डायरेक्टर डॉ.श्री.संजय अदाटे, फॅबटेक पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ श्री शरद पवार, स्कूलचे प्राचार्य श्री.सिकंदर पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले .कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व स्वागत गीताने झाली. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.याप्रसंगी कु.अजय पवार यांने स्टुडंट कौन्सिलचे स्कूलमधील कार्य याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. गतवर्षीची हेडगर्ल कु.पूर्वा दौंडे हिने हेडगर्लचे अनुभव व्यक्त केले यानंतर स्कूलचे नवनिर्वाचित हेडगर्ल कुमारी वेदिका माने व हेडबॉय कुमार प्रतिक दुपडे यांना पाहुण्यांनी बॅज लावले. यानंतर ब्ल्यू हाऊस कॅप्टन कु.वैष्णवी खरात व व्हाईस कॅप्टन कु.ओम खांडेकर, यलो हाऊस कॅप्टन कु.चैतन्य भाले, व्हाईस कॅप्टन कु.आर्यन दौंडे, रेड हाऊस कॅप्टन कु.अभिषेक शिर्के, व्हाईस कॅप्टन कु. ओमकार जानकर, ग्रीन हाऊस कॅप्टन कु.अन्वी कांबळे , व्हाईस कॅप्टन कु.आदर्श शिंदे यांनी पाहुण्यांसमोर हाऊसचे प्रतिनिधित्व करत परेड सादर केली, यानंतर कॅप्टन व व्हाईस कॅप्टनला पाहुण्यांच्या हस्ते बॅज लावले.सुपरवायझर सौ.वनिता बाबर यांनी विद्यार्थ्यांना शपथ दिली. यानंतर पोलिस निरीक्षक श्री.अनंत कुलकर्णी यांनी अध्यक्षीय भाषणातून राष्ट्रप्रेम आणि राष्ट्राबद्दलची कर्तव्य सांगितली, विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणात नेतृत्वगुण विकसित केले पाहिजे तसेच प्रशालेतील या विद्यार्थी प्रतिनिधींची निवड ही निवडणूक प्रक्रियेतून विद्यार्थी प्रतिनिधी निवडला गेला याचे विशेष कौतुक केले . सकाळ वर्तमानपत्राचे रिपोर्टर श्री दत्तात्रय खंडागळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत जीवनात वाचनसंस्कृती लोप पावत आहे आपले अनुभवविश्व समृद्ध करण्यासाठी वाचन केले पाहिजे असे सांगितले. संस्थेचे चेअरमन श्री. भाऊसाहेब रुपनर, मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. श्री. अमित रुपनर, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर श्री. दिनेश रुपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ.श्री.संजय अदाटे व प्राचार्य सिकंदर पाटील यांनी स्टुडंट कौन्सिल विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.मृणाल राऊत यांनी केले. आभार श्री.शहनवाज मुजावर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सद्गुरु हॉस्पिटल
आय.सी.यु. & ट्रॉमा केअर सेंटर, सांगोला
मायाक्का माऊली कमर्शियल कॉम्प्लेक्स,
एस.टी.स्टॅण्ड शेजारी, सांगोला
Hospital No. 02187-220020
Contact : 7066373858

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व
अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी पुर्णपणे मोफत व गुणवत्तापूर्ण आरोग्य योजना
आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना

लाभार्थी
- पिवळे, केशरी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक कुटुंबे
- अवर्षणग्रस्त १४ जिल्हयातील शुभ्र शिधापत्रिका व ७/१२ उतारा धारक शेतकरी कुटुंबे
- शासकीय अनाथाश्रमातील मुले शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी शासकीय महिला आश्रमातील महिला, शासकीय वृध्दाश्रमातील जेष्ठ नागरिक, माहिती व जन संपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार, महाराष्ट इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत जीवित बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंब - संबधीत संस्था/प्राधिकरण यांचे कडील ओळखपत्रानुसार पात्र.

लाभ घेण्यासाठी
- वैध शिधापत्रिका व फोटो ओळखपत्र (आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान कार्ड इत्यादी)

लाभार्थी
- सामाजिक, आर्थिक व जातनिहाय (SECC) जनगणनेत नोंदीत ग्रामीण व शहरी भागातील कुटुंबे

लाभ घेण्यासाठी
- आयुष्मान कार्ड (ई-कार्ड) व फोटो ओळखपत्र

आयुष्मान कार्ड प्राप्त करण्यासाठी
- आयुष्मान कार्ड बनविण्यासाठी शिधापत्रिका/मा.प्रधानमंत्री महोदयांचे पत्र व वैध ओळखपत्र (आधार कार्ड) घेऊन अंगीकृत रुग्णालय किंवा नजीकच्या आपले सेवा केंद्र/UTIITSL केंद्रास भेट देणे
- आपले सरकार सेवा केंद्र/UTIITSL केंद्राकडून प्रति ई-कार्ड रु.३० इतके शुल्क आकारले जाईल तर योजनेच्या अंगीकृत रुग्णालयांमधून ई-कार्ड नि:शुल्क दिले जाईल.
- रुग्णालयात कोणतीही समस्या असल्यास आरोग्यमित्राला भेट देणे.
- संगणकप्रणालीवर नाव असेल तरच आयुष्मान कार्ड (ई-कार्ड) मिळेल.

उपलब्ध सुविधा
* बाह्यरुग्ण विभाग (OPD)
* आंतररुग्ण विभाग (IPD)
* अतिदक्षता विभाग (ICU)
* सुसज्य ऑपरेशन विभाग (OT)
* २४तास अत्यावश्यक सेवा (Casualty)
* डिजीटल X-Ray ची सोय
* C-ARM ची सोय * ई.सी.जी.

जनरल सर्जरी विभाग
* अपेंडिक्स फुटलेली शस्त्रक्रिया
* आतड्याला होल (छिद्र) यावरील शस्त्रक्रिया
* छातीला / पोटाला मार लागलेला यावरील शस्त्रक्रिया

अस्थिरोग विभाग
* हाडांच्या सर्व फ्रॅक्चरचे ऑपरेशन
* मणक्याचे आजार व उपचार
* दुर्बिनीद्वारे शस्त्रक्रिया
* फिजोथेअरेपी
* कृत्रिम सांधाबदल शस्त्रक्रिया (Joint Replacement Surgery)
* टाके घेणे
* जबड्याचे फ्रॅक्चरचे ऑपरेशन

इतर सुविधा
* Ventilator (कृत्रीम श्वासोच्छवासाचे मशिन)
* Defibrillator Machine
* Nebulization Machine (औषधी वाफ देण्याची सोय)
* Central Oxygen System (ऑक्सिजनची सोय)
* Multi-Para Cardiac Monitor
* २४ तास मेडिकल सेवा
* २४ तास जनरेटर सोय
* लॅब्रोटरीची सोय
* प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ

अतिदक्षता विभाग
* हृदयरोग (हार्टअटॅक) * डायबेटीस (मधुमेह) * बी.पी. * विषबाधा * सर्पदंश * आर्धांगवायू * डेंगु * मलेरीया * गोचिड ताप * पेशी कमी होणे * मेंदूचे विकार * फिटस् (आडकी) * छातीचे व फुफुसाचे आजार * रोड ॲक्सिडेंट

डॉ.डी.डी. गावडे M.B.B.S., D.Ortho (Mumbai), A.T.L.S. अस्थिरोग तज्ञ
डॉ.प्रसाद साळे M.B.B.S., M.D.(Emergency Medicine) कन्सल्टंट फिजिशियन
डॉ.अमोल देगावकर DNB NEURO SURGEON मेंदू व मणका तज्ञ
डॉ.दिपक बुरुंगले M.D.S.
डॉ.सुधीर दोबळे M.S. (General & laproscopic Surgen)
डॉ.अजिंक्य नष्टे M.B.B.S., M.D.(Medicine)
डॉ.विजय भोसले M.S.(Ortho)

# हिरवळीवरील नवे तारे

कमालीची चुरस आणि अनपेक्षित निकाल यामुळे स्पर्धा लक्षात राहते. रविवारी संपलेल्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेबाबत हेच म्हणता येईल. स्पेनच्या कार्लोस अल्कराझने सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचची ऑल इंग्लंड क्लबच्या सेंटर कोर्टवरील मक्तेदारी संपवली, पण त्याआधी २४ तास मार्केता व्हाँड्रोसोव्हाने जिंकलेले विजेतेपदही कमी महत्त्वाचे नाही. तिने यापूर्वी विम्बल्डन स्पर्धात एकच लढत जिंकली होती.

गतवर्षीची स्पर्धा हाताला प्लॅस्टर असताना तिने बघितली होती. अर्थात, अल्कराझचे यश जास्त चर्चेत राहणार. रफाएल नदाल, रॉजर फेडरर आणि नोव्हाक जोकोविच यांनी काही वर्षांपासून पुरुष टेनिस स्पर्धांत हुकूमत राखली. फेडररने २००३ मध्ये विम्बल्डन स्पर्धा जिंकल्यापासून या तिघांनी एकत्रित ६५ ग्रँड स्लॅम जिंकली आहेत. फेडरर गेल्या वर्षी निवृत्त झाला. त्यानंतर नदाल आणि जोकोविचने दहापैकी आठ ग्रँड स्लॅम जिंकल्या. फेडरर-जोकोविच-नदाल यांच्याखेरीज गेल्या वीस वर्षींत केवळ अँडी मरेने ही स्पर्धा जिंकली. या चौघांची कारकीर्द सुरू होत असताना अल्कजराझचा जन्म झाला. तेव्हा तो टेनिसची मूळाक्षरे गिरवत होता. फेडररचा विम्बल्डनमधील सरावस्नेही होत होता. त्याने गतवर्षी अमेरिकन ओपन जिंकली. जागतिक क्रमवारीत वेगाने प्रगती केली. तरीही तो जोकोविचचे वर्चस्व मोडेल, अशी अपेक्षा नव्हती. ते साहजिकच आहे. जोकोविच विम्बल्डनमध्ये जास्त ताकदवान. तो या स्पर्धेत २०१७पासून अपराजित आहे. तो २०१३ मध्ये अँडी मरेविरुद्ध निर्णायक लढतीत पराभूत झाला. त्यानंतर त्याने सेंटर कोर्टवर एकही लढत गमावली नाही. त्यातच पाच आठवड्यांपूर्वी फ्रेंच स्पर्धेत जोकोविचने अल्कराझ हा दडपणाखाली कोलमडतो, हे दाखवून दिले. हे सर्व लक्षात घेता अल्कराझच्या यशाची कोणाला आशा असेल? पण पाच आठवड्यात अल्कराझ केवळ इंग्लिश खाडी ओलांडून आला नाही; तर खडतर लढतींचा सामना कसा करायचा, हेही शिकला. काही टेनिस लढती क्लासिक असतात, तर काही जास्त नाट्य निर्माण करतात. जोकोविच आणि अल्कराझ यांचा अंतिम सामना दुसऱ्या प्रकारातील होता. जोकोविचने पहिल्या सेटमध्ये ५-० अशी आघाडी घेतल्यावर या लढतीत पाच तासांचा कडवा संघर्ष कोणी अपेक्षिला नव्हता. जोकोविच पुन्हा दडपण आणून अल्कराझला धूळ चारण्यास उत्सुक होता. मात्र, अल्कराझने दडपणाचे आव्हान पेलले. स्पेनचे राजे अंतिम लढतीस उपस्थित असूनही तो मानसिक दबावाखाली आला नाही. टेनिस जगतातील सर्वोच्च मानाच्या आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात शांत खेळ केला. त्याच्या या दुसऱ्या ग्रँड स्लॅम विजेतेपदाची आता जास्त चर्चा होईल.

मार्केता गत स्पर्धेत प्रेक्षक होती. तिने खास मैत्रीण मिरियम कोलोदझिएजोवा हीच्या मुख्य स्पर्धेतील पात्रतेचा आनंद घेतला होता. कदाचित, यामुळेच तिचे यापूर्वीचे यश दुर्लक्षित झाले होते. ती २०१९ च्या फ्रेंच स्पर्धेतील उपविजती आहे. तिने टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकले, तरीही क्रीडा रसिकांत फारशी चर्चा नव्हती. प्रतिस्पर्ध्यांचा कस पाहणारी टेनिसपटू अशीच तिची टेनिस जगतात ओळख होती. डावखुरी मार्केता खेळाची चांगली अभ्यासक; तसेच फसव्या रॅली खेळण्याची तिची खासियत. तिला कोणीही विजेतेपदासाठी गृहीत धरत नव्हते. हिरवळीच्या कोर्टवर दहापैकी दोन लढतीच तिने जिंकल्या होत्या. या स्पर्धेतही यापूर्वी एकच विजय मिळविला होता. मनगटाच्या दुखापतीचा तिला फटका बसला होता. पूर्णपणे व्यावसायिक टेनिसपटू असूनही पुरस्कर्ते नव्हते. अगदी पोषाखासाठीही कुणी पुरस्कर्ते नव्हते. या परिस्थितीत ती मानांकन नसतानाही विम्बल्डन जिंकणारी पहिली टेनिसपटू ठरली. या यशाची तिलाही अपेक्षा नसावी. ती या स्पर्धेत चार मानांकितांना हरवून पुढे जात असताना तिचा पती घरी मांजरांचे संगोपन करीत होता. मात्र, अंतिम सामन्यांसाठी तो आला. तिच्या मैत्रिणी, आप्तेष्ट तसेच चाहतेही आले. विजेतेपदासह कोर्टला फेरी मारताना तिच्या चेहऱ्यावरून आनंद निथळत होता. प्रतिकूल परिस्थितीत साथ देणाऱ्यांचे आभार मानण्याची हीच संधी आहे; हीच तिची भावना होती. आता मात्र तिच्या यशाची दखल घेतली जाईल. या स्पर्धेपूर्वी ती जागतिक क्रमवारीत ४२वी होती. एवढेच नव्हे तर चेक प्रजासत्ताकात सातव्या क्रमांकाची खेळाडू होती. आता ती अव्वल दहात आली आहे. मार्केता जिंकत असताना तिच्या लढतीचे प्रक्षेपण हक्क असलेल्या बीबीसीने तिच्यावर केलेल्या अन्यायावर चाहते समाज माध्यमांवर टीका करत आहेत. बीबीसीने केवळ ओन्स जबेरने किती संघर्ष केला, यावरच भर दिला. असो, मार्केता तसेच कार्लोस अल्कराझच्या विजेतेपदामुळे स्पर्धेच्या पहिल्या आठवड्यात रशिया तसेच बेलारुसच्या खेळाडूंच्या सहभागावरून झालेली चर्चा, त्या देशातील खेळाडूंविरुद्ध पराभूत झालेल्यांची हुर्यो.. या गोष्टींचा चाहत्यांना विसर पडला. दोन्ही अनपेक्षित पण गुणी विजेत्यांना याचे श्रेय आहे.

**दैनिक सांगोला सुपरफास्ट हे पत्र मुद्रक श्री. विनायक अरुण लोखंडे यांनी प्रकाशक मालक श्री.वैभव सुखदेव जांगळे यांच्यासाठी वैभव ऑफसेट, सांगोला, जि.सोलापूर ४१३३०७ (महाराष्ट्र) येथे छापून आनंद निवास, वासूद रोड सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर ४१३३०७ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले.**

**या अंकात प्रसिध्द होणाऱ्या मजकुरासाठी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद-विवाद सांगोला न्यायकक्षेत.**

**संपादक : वैभव सुखदेव जांगळे**

# उडता भारत....

### बेधडक.. रोखठोक.. जनसामान्यांच्या प्रश्न

काही वर्षांपूर्वी उडता पंजाब हा हिंदी सिनेमा प्रदर्शित झाला होता .यात पंजाब मध्ये तेथील बहुतेक तरुण अमली पदार्थांच्या आहारी गेल्याचे चित्रण होते. पंजाब भारत पाक सीमेवर आहे.

तेथील सिख, पंजाबी जमात अत्यंत शूर, लढवय्ये व काटक म्हणून विश्वात प्रसिद्ध आहे. तसेच प्रगतिशील शेतकरी म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. भारतीय सैन्य दलात शूर, धाडसी व लढवय्ये सैनिक म्हणून त्यांची ख्याती आहे. प्रत्येक देशाची कूटनीती असते. आपल्या शेजारी पाक हा जन्मत:च आपला वैरी म्हणून कुप्रसिद्ध आहे.

पंजाब हे प्रगतिशील राज्य आहे. देशातील गव्हाचे पीक तेथे मोठ्या प्रमाणात येते. भारतीय सैन्यदल कमकुवत

व्हावे व संरक्षण सिद्धता कमजोर व्हावी या कूटनीती चा वापर करून पंजाबी जनतेला वाम मार्गाला म्हणजे व्यसनी बनवून भारताची सैन्य शक्ती कमकुवत करण्याचा हा डाव आहे.तसेच पंजाब राज्य आर्थिक दृष्ट्या मागास व्हावे हा सुध्दा त्या मागे कटकारस्थान आहे हे स्पष्ट दिसते .म्हणून पाक ने चोरीच्या मार्गाने पंजाब मध्ये गांजा, अफू,

कोकिन व भांग हे अमली पदार्थ पाठवीत आहे. आता सुद्धा त्या राज्यात अनेक घरी हुक्का मारताना अनेक लोक दिसतील. पाकिस्तानचा हा डाव बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला आहे असे चित्र दिसते . म्हणून उडता पंजाब हा चित्रपट तयार केला होता . नशा केल्यावर व अमली पदार्थाचे सेवन केल्यास व्यक्ती जणू वर उडत असते असा भास होतो. व्यक्तीचा मेंदू वरचा ताबा नाहीसा झालेला असतो, तिचे स्वत:वरच नियंत्रण राहत नाही. जणू वरील वातावरणात उडत आहे असे तिला भासते.म्हणून चित्रपटाचे नाव उडता पंजाब हे योग्य होते असे म्हणावयास हरकत नाही.

आपण जर विचार केला तर देशात इतर ठिकाणी अशी स्थिती आहे की नाही? आहे निश्चित आहे.देशातील प्रत्येक राज्यात अशी परस्थिती आहे हे आपणास कबूल करावे लागेल. अनेक राज्यात ठिकठिकाणी ,प्रत्येक मोहल्यात वाईन शॉप, दारू ची उघड उघड व कायदेशीर असलेली दुकाने दिसतात .जेव्हा आपण राजं मार्गाने प्रवास करतो भर रस्त्यावर दारूची दुकाने दिसतील. बीयर बार, वाइन शॉप, देशी दारूची दुकाने रस्त्याच्या दोन्ही बाजूला दिसतात. अनेक ट्रक चालक तेथे पिण्यास जातात हे आपण पाहतो .लगेच त्यांच्या गाडीची गती वाढलेली दिसते.यामुळे अनेक अपघात होतात हे आपण प्रत्यक्ष पाहत असतो .तसेच काही धाब्यावर अफू, गांजा व इतर अमली पदार्थाची यांची व्यवस्था असते.

केवळ पंजाब राज्य उडते राज्य म्हणणे हे योग्य नाही. सारा देश उडता भारत आहे हे मोठ्या धाडसाने म्हणावे लागते .ही अगदी सत्य परिस्थिती आहे हे प्रत्येकाला कबूल करावेच लागेल.आपल्या देशाने लोकशाही प्रणाली स्वीकारलेली आहे.लोकशाही मध्ये प्रत्येक राजकीय पक्षाला सत्ता मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात.लोकशाही असो किंवा एकाधिकारशाही असो दोन्ही प्रणाली मध्ये फायदे ही आहेत व तोटेही आहेत. लोकशाही मध्ये प्रचार व प्रसार केल्याशिवाय पक्षाची ताकद दिसत नाही. निवडणूक काळात तरुणांना हाताशी धरून प्रचार करणे आवश्यक असते. निवडणूक कोणतीही असो रात्रंदिवस प्रचार करावाच लागतो. तरुणांना स्फूर्ती व शक्ती मिळावी म्हणून त्यांस खाऊ पिऊ घालावे लागते. रात्री सर्व बार, धाबे तरुणांनी भरलेले दिसतात केवळ जेवण नाही तर दारू (देशी व विदेशी) यांची व्यवस्था करण्यात येत असते .ग्रामपंचायत ते लोकसभेच्या निवडणुकीत असे दृश्य हमखास दिसते. यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन झालेली आहे. कारण हा खर्च उमेदवार करीत असतो.

देशात कुठेही जा निवडणूक काळात असे वातावरण निश्चित दिसते. त्या शिवाय तरुण प्रचाराला येणार नाहीत. निवडणूक काळात सर्वात जास्त अमली पदार्थांचा खप खूप होतो असा अहवाल आहे. या व्यसनाधीन मुळे अनेक तरुणांचे संसार उध्वस्त झाले आहेत.म्हणून काही वेळेस असे वाटते की लोकशाही आहे की बरबाद शाही आहे ! कारण अनेक तरुण व्यसनाधीन होऊन आळशी व निष्क्रिय होतात. त्यांचे जीवन उध्वस्त होते . केव्हाही जा आपल्याला बार, धाबे मध्ये तरुण घोळके करून बसलेले दिसतात.

आपल्या देशाला निवडणुकीचा देश म्हणतात. वर्षभर देशात निवडणुकीचे वारे वाहत असतात.म्हणून ग्रामीण भागापासून ते देल्ही पर्यंत बार भरलेले दिसतील. हा लोकशाहीचा मोठा दोष आहे हे आपणास मान्य करावे लागेल. आपल्या देशात अफाट जनसंख्या वाढली आहे. बेकारी मुळे अनेक तरुण अमली पदार्थांचे सेवन करीत असतात.लोकसंख्येच्या मानाने रोजगार अत्यल्प आहे. त्यामुळे तरुण वर्ग उदास व निराश होऊन व्यसनाधीन होतो ही सत्य स्थिती आहे. अनेक राज्ये उत्पन्न व महसूल वाढावे म्हणून दारूचे कारखाने काढतात. त्यांच्या खपासाठी दारूचे दुकाने ठिकठिकाणी दिसत आहेत.हे एकप्रकारे जनतेला व्यसनाधीन करण्याचा प्रकार आहे. राज्यकर्त्यांची व जनतेची नीतिमत्ता खालावत आहे. समाज वाईट मार्गाला जात आहे. तरुण वर्गाला आदर्श राहिला नाही. साऱ्या जनतेला जिकडे तिकडे दारूची दुकाने नजरेस पडतात. राज्याच्या प्रगतीच्या नावाखाली

समाजाची अधोगती होत आहे ही आजची देशाची अवस्था आहे . केवळ पंजाब राज्य उडत आहे असे नसून पूर्ण देश उडत आहे हे आपण पाहत आहे. यास मुख्य कारण म्हणजे देशातील निवडणुका व लोकशाही प्रणाली!

**खान्देश सम्राट संपादक, हेमंत जगदाळे, धुळे**

# आणखी एक मानाचा तुरा



गुरुवर्य प्रबुद्धचंद्र झपके सर यांना नुकताच किसन आर्मी आणि वॉटर आर्मी चे संस्थापक अध्यक्ष, प्रफुल्ल कदम यांच्या संकल्पनेतून डॉ.गणपतराव देशमुख सांगोला तालुका भूषण जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाल्याचे समजले. त्यामुळे एक विद्यार्थी, एक सहकारी, एक मानस बंधू व सरांचा लहानपणीचा शेजारी या नात्याने त्यांचा संपूर्ण जीवनपट माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला. सरांना हा पुरस्कार जाहीर झाल्याचे समजल्या नंतर इतरांना जेवढा आनंद झाला, किंबहुना थोडा अधिकच आनंद मला झाला आहे, त्यामुळेच मी माझी त्यांच्या विषयी असणारी आदराची व स्नेहांची शब्द फुलांची ओंजल आपणा पुढे अर्पण करत आहे.सरांचा मी गल्लीतील बालपणीचा मित्र, परंतु सर १९७६ साली विद्यामंदिर चे सेवेत आले,तेव्हा मी बारावीत होतो.वयातील थोड्या फार अंतरमुळे व नंतर नव्याने निर्माण झालेल्या गुरू - शिष्य नात्यामुळे मोकळेपणा कमी होवून आदर वाढल्यामुळे मी संकोचून थोडा दूर राहत होतो.प्रारंभी १९८०चे दशकात सरांनी लायन्स चे माध्यमातून समाजकार्य उभे करण्यास सुरुवात केली.तेव्हापासूनच सराना वेगवेगळे पुरस्कार मिळण्यास सुरुवात झाली असावी.सन १९८५ साली सर प्रथमच सांगोला नगर पालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले व नंतर १९८९-९०चे सुमारास नगराध्यक्ष झाले.तेथूनच त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात झाली.आमदार गणपतराव देशमुख यांची व सरांची राजकीय विचार सरणी भिन्न असून देखील व्यक्तिगत पातळीवर दोघांचे सबंध सलोख्याचे होते. एंशी टक्के समाजकारण व वीस टक्के राजकारण या विचाराने काम करत असताना सरांनी विधान सभा निवडणुकीत आबा साहेबाना पक्षीय विचार सरणी मुळे विरोध केला, मात्र स्थानिक राजकारणात सर कायम आबासाहेब समवेत राहिले आहेत.राजकारणात बऱ्याच उलथापालथी होत असताना आबासाहेब ज्या पद्धितीने शेकाप चे विचार सरणी शी प्रामाणिक राहिले, त्याच पद्धतीने झपके सर काँग्रेस विचाराशी प्रामाणिक राहिले. केवळ दोघांतील या समान विचारांचा योग्य तो धागा पकडुन प्रफुल्ल कदम यांनी आबासाहेब यांच्या नावाने दिला जाणारा पहिला जीवन गौरव पुरस्कार सरांना जाहीर केला असावा असे मला वाटते.सराना आजपर्यंत.मानाचे अनेक पुरस्कार जिल्हा व राज्य स्तरावर प्राप्त झाले आहेत.हा पुरस्कार आगळा वेगळा आहे.उद्याच्या १ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लो.टिळक पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.थोडा फार तसाच हा पुअस्कर आहे.लो.टिळक आणि मोदी यांची पक्षीय भूमिका भिन्न असून देखील मोदींचे कार्य, त्यांची.आंतर राष्ट्रीय पातळीवर असलेली प्रतिमा व कर्तुत्व पाहून त्यांना पुरस्कार दिला जाणार आहे.त्याच पद्धतीने झपके सरांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक,अध्यात्मिक क्षेत्रातील योगदान विचारत घेऊन प्रफुल्ल कदम यांनी हा जीवन गौरव पुरस्कार सरांना जाहीर केला आहे. त्या बद्दल किसन आर्मी, वॉटर आर्मी चे संपूर्ण टीमचे मो मनापासून अभिनंदन करतो.या पुरस्कार मुळे सरांच्या पुरस्कारात केबल एकाने भर पडली असे.नसून.आबा साहेबांच्या नावाने दिला जाणारा पहिला जीवन गौरव पुरस्कार सरांना मिळतो आहे,याचा आनंद खचितच जास्त आहे.सरांच्या कार्य कर्तुत्वाला व समाज कार्याला घरच्या मंडळींनी दिलेली ही प्रेमाची व अनोखी भेट आहे, या पुरस्कार चे निमित्ताने सरांचे हार्दिक.अभिनंदन आणि शुभेच्छा.त्याच प्रमाणे किसन आर्मी आणि वॉटर पार्क ने सुरू केलेल्या या आगळ्या वेगळ्या आणि अनोख्या उपक्रमास मनापासून शुभेच्छा.

# राजकीय हिंसाचाराचे बळी कार्यकर्तेच

पश्चिम बंगालमध्ये नुकत्याच नगर पंचायतीच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीत भाजप आणि ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस आमने सामने होते. या निवडणुकीचा निकाल नुकताच लागला. या निवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने बाजी मारली मात्र ही निवडणूक गाजली ती हिंसाचाराने. या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला. भाजप आणि तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते समोरासमोर आले. त्यांच्यात हिंसक आंदोलने झाली. गावागावातील कार्यकर्ते समोरासमोर आल्याने पोलिसांपुढील आव्हान वाढले. या निवडणुकीत हिंसाचार इतका वाढला की दोन्ही कडील सुमारे ४० हुन अधिक कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला आणि शेकडो कार्यकर्ते जखमी झाले अर्थात पश्चिम बंगालला राजकीय हिंसाचार हा नवा नाही. याआधी पश्चिम बंगालमध्ये जेंव्हा विधानसभा निवडणुका झाल्या तेंव्हाही असाच हिंसाचार उसळला होता त्यावेळी तर थेट बॉम्बचा वापर झाला होता. तेंव्हाही अनेक कार्यकर्ते मरण पावले होते. पश्चिम बंगालमध्ये निवडणुका आणि हिंसाचार हे जणू समीकरणच बनले आहे. हिंसाचाराशिवाय पश्चिम बंगालमध्ये निवडणुका होतच नाही. दोन दशकांपूर्वी पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी आणि काँग्रेस हे दोन मुख्य पक्ष होते. मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी हा सत्ताधारी पक्ष तर काँग्रेस हा विरोधी पक्ष असायचा तेंव्हा देखील निवडणुकीत असाच हिंसाचार व्हायचा. कम्युनिस्ट आणि काँग्रेस कार्यकर्ते निवडणुकीत समोरासमोर यायचे आणि त्यांच्यात रक्तरंजित हिंसाचार व्हायचा. तेंव्हाही हिंसाचारात दोन्ही बाजूचे कार्यकर्ते धारातीर्थी पडत आता पक्ष बदलले मात्र निवडणुकीतील हिंसाचार मात्र कमी झाला नाही उलट वाढतच गेला आहे. यावर्षी तर कहरच झाला. मागील सर्व हिंसाचाराचा रेकॉर्ड यावेळी तुटला. अर्थात या हिंसाचारात आजवर कधीही नेत्यांचा मृत्यू झाला नाही. निवडणुकी दरम्यान होणाऱ्या या रक्तरंजित हिंसाचारात कधी मोठ्या नेत्यांचा, मंत्र्यांच्या किंवा आमदार खासदारांचा मृत्य

**■ श्याम ठाणेदार**

दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५

झाल्याची घटना घडली नाही. राजकीय हिंसाचारात कायम बळी जातो तो कार्यकर्त्यांचा. कार्यकर्ते आपल्या नेत्यासाठी मरण पत्करतात. त्यांची कुटुंबे उघड्यावर येतात. नेत्यांकडून कार्यकर्त्यांचे कुटुंबाचे सांत्वन केले जाते त्या नंतर मात्र या कुटुंबाला वाऱ्यावर सोडले जाते. विशेष म्हणजे हा हिंसाचार फक्त निवडणुकीच्या काळातच होतो. निवडणुका संपल्या की हिंसाचार देखील संपतो मात्र दोन्ही कडील कार्यकर्त्यांमधील खुन्नस मात्र संपत नाही. निवडणूक संपली तरी कार्यकर्त्यातील शत्रुत्व संपत नाही. इकडे नेते मंडळी मात्र एकत्र येतात. निवडणुकीनंतर सत्तेसाठी ते एकमेकांच्या गळ्यात गळे घालतात. जणू काय काही घडलेच नाही अशा आविर्भावात वावरतात. सत्ताधारी पक्षातील नेते विरोधी पक्षात आणि विरोधी पक्षातील नेते सत्ताधारी पक्षात प्रवेश करतात. सत्तेसाठी आणि स्वत:च्या स्वार्थासाठी निष्ठा बदलतात. स्वत:चा फायदा असेल त्यावेळी नेत्यांना कार्यकर्ते दिसत नाही मात्र निवडणुकीत जिंकून येण्यासाठी याच कार्यकर्त्यांचा ढाल म्हणून वापर केला जातो. हिंसाचारासाठी कार्यकर्त्यांचा वापर केला जातो आणि या हिंसाचारात जीव जातो तो कार्यकर्त्यांचा त्यामुळे कार्यकर्त्यांनी आपण नेत्यांच्या कितपत नादी लागावे हे ठरवावे. नेते लोक कार्यकर्त्यांचा फक्त वापर करतात हे ओळखून कार्यकर्त्यांनी नेत्यांसाठी स्वत:च्या जीवाचे बलिदान देण्यापेक्षा आपल्या कुटुंबासाठी आपल्या देशासाठी त्याग करावा. राजकीय नेत्यांच्या नादी लागून आपल्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडून देणे कितपत योग्य आहे ? याचा विचार सर्वच पक्षातील राजकीय कार्यकर्त्यांनी करायला हवा.

# पोहे, डोसा, उपमा बनवताना असे वाढवा प्रोटीनचे प्रमाण; डायबिटीज, हायपरटेन्शनवर रामबाण उपाय



भारतीय ब्रेकफास्ट हा मुख्यत: कार्बोहायड्रेट युक्त असतो. आता कार्ब्स ही समस्या आहेच पण त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपल्या आहारात प्रोटिन्स व अन्य पोषक सत्व कमी किंवा नगण्य प्रमाणात असतात त्यामुळेच आहारात संतुलन येत नाही. आपल्या आहारात विशेषत: ब्रेकफास्टमध्ये काही गोष्टी मिसळल्यास तुम्हाला सकस आहाराचे पोषण मिळू शकते. आज आपण कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, मुंबई येथील मुख्य आहारतज्ज्ञ भक्ती सामंत यांच्याकडून पोहे, उपमा, डोसा, ढोकळा अशा पदार्थांमधील प्रथिनांचे प्रमाण वाढवण्यासाठी काय करता येईल हे जाणून घेणार आहोत.

१ पोहे बनवताना त्यात वाफवलेले मूग (स्प्राऊट्स) आणि भाज्या टाकून बनवल्यास प्रोटीन मिळण्यास मदत होऊ शकते. डाळीतील प्रथिने तृप्ति देतात आणि पचनाचा कालावधी त्यामुळे वारंवार भूक लागणे कमी होते. शिवाय भाज्यांतील फायबर हे पचनाचा वेग सुरळीत राखण्यास मदत करतात. एकत्रितपणे यामुळे जेवणानंतर रक्तदाब वाढणे टाळता येते. २ उपमा/दलिया/शेवई उपमा/ओट्स उपमा पाण्याऐवजी ताक घालून बनवता येईल. सर्व तृणधान्यांमधील कार्बोहायड्रेट्स हे प्रथिने समृद्ध असलेल्या ताकामध्ये शिजवल्यास, मॅक्रोन्यूट्रिएंट्सचे चांगले संतुलन प्रदान करतात, यामुळे पोटाची तृप्ति आणि पचन सुधारते. ३ तुम्ही इडली किंवा डोसा पीठ तयार करत असताना तांदूळ आणि उडीद डाळ ३:१/४:१ ऐवजी १:१/२:१ च्या प्रमाणात मिसळा.यामुळे तांदूळातील कर्बोदकांमधे आणि डाळीतील प्रथिने यांच्यात चांगले संतुलन निर्माण होईल. ४ पराठा बनवताना त्यात भरपूर भाज्या आणि डाळीचे पीठ घाला जे प्रथिनांचे प्रमाण वाढवण्यास मदत करते. ५ चिला किंवा आंबोळ्या/पॅनकेक बनवण्यासाठी डाळीचे पीठ वापरा. यातून मुबलक प्रथिने आणि कार्बोहायड्रेट्स मिळू शकतात. ६ रवा ढोकळा बनवताना त्यात पाण्याऐवजी दही किंवा ताक वापरावे. रव्यात कार्बोहायड्रेट्स अधिक असतात, जे प्रथिने समृद्ध असलेल्या ताकमध्ये शिजवल्यास मॅक्रोन्युट्रिएंट्सचे चांगले संतुलन मिळते. संशोधनात असे दिसून आले आहे की प्रथिनेयुक्त ब्रेकफास्ट (ज्यामध्ये निदान ३५ ग्रॅम प्रथिने असतील) तुम्हाला सतत भूक लागण्याचे प्रमाण कमी करू शकतात. यामुळे विशेषत: संध्याकाळच्या वेळी सुद्धा अशा प्रकारचा नाष्टा तुमच्या पोटाला तृप्ती देऊ शकतो. तुम्ही इंटरमिटंट फास्टिंग करणार असाल तर याचा फायदा होऊ शकतो.

(टीप: वरील लेख हा प्राप्त माहितीवर आधारित आहे. गरज भासल्यास वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला आवश्य घ्या)

# उत्तर आणि वायव्य भारतात पावसाचा कहर सुरूच

सध्याच्या परिस्थितीत देशातील उत्तर आणि वायव्य भागातील अती पावसामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.यामुळे भुस्खलन व नद्यांच्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात जिवित हाणी सुध्दा झाली आहे.त्याचप्रमाणे शेतात पाणी घुसल्याने शेतकऱ्यांचे सुध्दा मोठे नुकसान झाले आहे.पावसाळ्याची गंभीर परिस्थिती पहाता सर्वांनी स्वत:ला सांभाळने गरजेचे आहे. यावर्षी पाऊस उशिरा आला. परंतु देशातील काही भागात पावसाने उग्र रूप धारण केल्याने देशातील अनेक भागात पुर परिस्थीती निर्माण होवून अनेक भाग जलमग्न झाल्याचे दिसून येते.सध्याच्या परिस्थितीत दिल्ली, उत्तर प्रदेश, ओडिशा,झारखंड, बिहार, सौराष्ट्र व कच्छ, पंजाब, हरियाणा, उत्तराखंड,हिमाचल प्रदेश सह अनेक भागात सरासरी पेक्षा जास्त पाऊस झाल्याने पावसाने विक्राळ रूप धारण केले आहे.यामुळे जिकडे पहाल तिकडे आपल्याला पाणीच पाणी दिसते.काही भागात ढग फुटी सुध्दा झाली आहे.यामुळे सर्वत्र गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणात मानवी व पशुपक्षांची जीवित हाणी सुध्दा झाली आहे.देशात अनेक नद्यांना महापुर आलेला असुन संपूर्ण नद्या तुडुंब भरून धोकादायक स्थितीमध्ये आहेत.यामुळे अनेक धरण भरल्याने प्रत्येक धरणाचे दरवाजे उघडण्यात आले आहेत.त्यामुळे भारतात आपल्याला पुराने थैमान निर्माण झाल्याचे दिसून येते.देशात अनेक भागांमध्ये पुरांमुळे अनेक गावांचा संपर्क तुटल्याचे दिसून येते.हिमाचल प्रदेशात तर पावसाने भयानक धुमाकूळ घातला आहे. हिमाचल प्रदेशात झालेल्या मुसळधार पावसामुळे आठ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जाते.भूस्खलन, रस्त्यांना खड्डे, पूरस्थितीमुळे रस्त्यासह पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.त्याचप्रमाणे अती पावसामुळे ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यांना मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने दुर्घटनांचे प्रमाणात प्रमाणात वाढले आहे जनुकाय अती पाऊस मौत का कुवॉ बनल्याचे दिसून येते.हा सर्वप्रकार निसर्गाचा ह्रास होत असल्याने निर्माण झालेला आहे.त्यामुळे जीवीत हानी सुध्दा होत आहे.पावसाचे विक्राळ रूप पहाता व यामुळे निर्माण होणारी पुरपरीस्थीती, रस्त्यांना पडलेले खड्डे यामुळे होणाऱ्या दुर्घटना यापासून सर्वांनीच सतर्क राहाने गरजेचे आहे.त्यामुळे जनतेने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नदी-नाल्याचा पुर, रोडचे खड्डे यापासून सावध रहावे जेनेकरून आपल्याला जिवीत हानी टाळता येईल.कारण जान है तो जहान हैहा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.आपण निसर्गाच्या महाप्रलयाला रोखु शकत नाही.परंतु सावधगिरी अवश्य बाळगू शकतो.त्यामुळे या कठीण घडीला प्रत्येकांनी आपापल्या परीने सावधगिरी बाळगली पाहिजे.कारण आपल्या पुर्वजांनी सांगितले आहे की आगीशी व पाण्याशी खेळु नये.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत पावसाच्या पाण्यापासुन सावधान रहाने अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रमाणे नदी-नाल्याच्या पुरातुन जावु नये किंवा प्रवास करू नये व स्वत:चा जीव धोक्यात टाकू नये.आज देशातील अनेक क्षेत्रातील घरे व शेती पाण्याखाली आलेली आहेत त्यामुळे गंभीर परिस्थिती आहे. सध्याच्या परिस्थितीत पावसाच्या पाण्याने विक्राळ रूप धारण केल्याने पशुपक्षी व मानवजातीसाठी काळ बनल्याचे दिसून येते.त्यामुळे सर्वांनीच नदी-नाल्याच्या पुरांपासुन सावधान राहुन आपले कार्य करावे व जान है तो जहान है हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारावा.कारण देशातील पुरपरिस्थितीवर सरकारी यंत्रणा आपली चोख भुमिका बजावीत आहे.अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणेला सर्वांनीच मदत करेन गरजेचे आहे.

**लेखक रमेश कृष्णराव लांजेवार.**

(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर

# गायरान अतिक्रमणे कायम करण्यासाठी राजू शेट्टींचा एल्गार

## १९ जुलैला विधानभवनावर मोर्चा धडकणार



मुंबई:–गायरान, गावठाण व वन विभागातील जमिनीवरील अतिक्रमणे कायम करावीत या मागणीसाठी विशाल मोर्चा आझाद मैदानात होणार आहे. या मोर्चाला राज्यातील प्रागतिक पक्षांच्या सर्व घटक पक्षांकडून पाठिंबा देण्यात आला आहे.

गायरान, गावठाण व वन विभागातील जमिनीवरील अतिक्रमणे कायम करावीत या मागणीसाठी १९ जुलै रोजी मुंबईत आझाद मैदान ते विधानभवन असा प्रागतिक पक्षांच्या सर्व घटक पक्षांकडून विशाल मोर्चा आयोजित केला असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी दिली. देशातील गोरगरीबांच्या जमिनी हिसकावून घेऊन अतिक्रमणाच्या नावाखाली भूमिहीन करण्याचा डाव सरकारने आखला आहे, एकाही अतिक्रमण धारकाची जमिन आम्ही जाऊ देणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला.

बुधवारी १९ जुलै रोजी दुपारी १२ वाजता हा विशाल मोर्चा आझाद मैदानात होणार आहे. या मोर्चाला राज्यातील प्रागतिक पक्षांच्या सर्व घटक पक्षांकडून पाठिंबा देण्यात आला आहे. बीआरएस, पीसीपीआय, सीपीआय (एम), शेकाप, स्वाभिमानी पक्ष, जनता दल (सेक्युलर) समाजवादी पार्टी, आरपीआय (सेक्युलर), एकलव्य सेना, लाल निशाण पक्ष, बहुजन विकास आघाडी, सीपीआय (एमएल) सत्यशोधक कम्यूनिस्ट पार्टी या पक्षांनी सक्रिय पाठींबा जाहीर केला आहे. या पक्षाचे आमदार देखील या प्रश्नाला विधानसभेत वाचा फोडणार आहेत. राज्यातील सर्व अतिक्रमण धारकांनी १९ जुलै रोजी हक्काच्या लढाईसाठी मुंबईतील आझाद मैदानावर हजर रहावे, असे आवाहन शेट्टी यांनी केले आहे.

# पशुधन जपण्यासाठी सरकार प्रयत्नशील, पशुखाद्य दर २५ टक्क्यांनी कमी करावेत; मंत्री विखे पाटलांचं आवाहन

मुंबई:– राज्यातील तीन कोटी पशुधन जपण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करत असल्याचे मत पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले. पशुखाद्य दर २५ टक्क्यांनी कमी करावे, असे आवाहन देखील विखे पाटील यांनी पशुखाद्य उत्पादकांना केले. 'पशुधन हिताय, बहुजन सुखाय' हे ब्रीद वाक्य जपत शेतकरी, पशुपालकांसाठी पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभाग काम करत असल्याचे ते म्हणाले.



पशुपालन आणि दूध उत्पादन व्यवसायामध्ये पशुखाद्याची गुणवत्ता ही अतिशय महत्वाची बाब आहे. उत्पादित दुधाचे प्रमाण आणि त्याची गुणवत्ता, त्याचप्रमाणे पशुंचे आरोग्य आणि पुनरुत्पादन क्षमता ही पशुखाद्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. त्यामुळं फुड्स सेफ्टी एड स्टॅण्डर्डस् ऑफ इंडिया या संस्थेच्या निर्देशानुसार राज्यात आयएसआय मार्क (बीआयएस प्रमाणकाप्रमाणे) पशुखाद्याचे उत्पादन व विक्री करणे बंधनकारक केले आहे. भारतीय मानक संस्थेच्या (बीआयएस) परवानाधारक पशुखाद्य उत्पादक संस्थांनीही भारतीय मानक संस्थेच्या प्रमाणकाप्रमाणेच पशुखाद्याचे उत्पादन करावे आणि पशुखाद्याच्या पॅकिंग बॅगवर पशुखाद्यातील अन्नघटकाचे प्रमाण (उदा. क्रुड प्रोटीन, क्रुड फॅट, क्रुड फायबर, कॅल्शियम, फॉस्फरस, श, मॉइश्चर, इत्यादी) ठळकपणे नमूद करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे अन्नघटकांच्या प्रमाणकासोबत पॅकिंग बॅगवर उत्पादक संस्थेचे नाव व पत्ता, उत्पादक परवाना क्रमांक, पशुखाद्य उत्पादनाचा दिनांक व बॅच क्रमांक, सदर उत्पादन वापरण्याचा अंतिम दिनांक (बेस्ट बिफोर युज), निव्वळ वजन (नेट वेट), विपणन (मार्केटिंग) कंपनीचे नाव व पत्ता या बाबीही ठळकपणे नमुद कराव्यात, असे निर्देश देण्यात आले असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

# प्राध्यापकांची कमालच! सहा–सात दिवसात तपासले ८० हजार पेपर; विद्यापीठाचे नवव्या दिवशीच निकाल

सोलापूर : 'ऑनस्क्रिन मूल्यमापन' प्रक्रियेला आता गती आली असून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने अवघ्या नऊ दिवसांतच काही अभ्यासक्रमांचा निकाल जाहीर केला आहे. आता सत्र परीक्षेच्या उर्वरित अभ्यासक्रमांचाही निकाल जाहीर करण्याची अंतिम तयारी सुरु केली आहे.

प्राध्यापकांनी सहा ते सात दिवसांत तब्बल ८० हजार पेपर तपासले आहेत. प्रभारी कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

परीक्षेनंतर विद्यापीठ व संलग्नित ११० महाविद्यालयातील जवळपास ८५ हजार विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी पूर्वी कोणते प्राध्यापक पॅनेलवर आहेत, सेवानिवृत्त व मृत प्राध्यापक देखील त्यात होते. पण, आता कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी प्राध्यापकांचा पॅनलच नवीन केला. प्राचार्यांची बैठक घेऊन निकालासंदर्भात सक्त सूचना केल्या.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, यादृष्टीने त्यांनी विद्यापीठात स्वतंत्र व्यवस्थाच (डॅशबोर्ड) निर्माण केली. त्यामुळे कोणता प्राध्यापक दररोज आणि किती उत्तरपत्रिका तपासतोय, याची माहिती विद्यापीठात बसून मिळू लागली. त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला आणि अवघ्या नऊ–दहा दिवसांतच सत्र परीक्षेचा निकाल जाहीर होऊ लागला आहे. सध्या पॅनेलवर एक हजार २२३ प्राध्यापक आहेत.निकाल वेळेत लागावा म्हणून पहाटे पाच ते रात्री १२ पर्यंत प्राध्यापकांनी मेहनत घेतल्याचाही आवर्जून उल्लेख कुलगुरूंनी बोलताना केला.

राज्याच्या 'सीईटी' सेलने विद्यापीठांमधील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेशपूर्व चाचणींच्या तारखा निश्चित केल्या आहेत. २० तारीख लास्ट मुदत दिली होती. त्यानुसार कुलगुरूंनी प्राचार्यांची बैठक घेऊन निकालासंदर्भात प्राध्यापकांना उत्तरपत्रिका तपासणीची डेडलाईन दिली. त्यानुसार कामकाज अंतिम टप्प्यात आले असून आता २५ ते २८ जुलैदरम्यान प्रवेशपूर्व चाचण्या होणार आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांना २१ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहेत.

कोरोनामुळे विस्कळित झालेले शैक्षणिक वर्ष आता पूर्वपदावर आणून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी विद्यापीठाकडून प्रयत्नांची पराकाष्ठा सुरु आहे. आगामी शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून सुरु होणार आहे. तत्पूर्वी, विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशपूर्व चाचण्या पार पडणार आहेत. विद्यार्थ्यांना त्यासंबंधीची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# सोनंद येथील हनुमान वाचनालयात वाचन सप्ताह उत्सव वातावरणात संपन्न



सांगोला: ( अमर कुलकर्णी ):–राष्ट्रीय वाचन सप्ताह निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनंद येथे हनुमान सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने वाचन संस्कृती गतिमान करण्यासाठी सामुदायिक पुस्तक वाचन उपक्रम राबवण्यात आला.

मुलांमध्ये वाचनाची गोडी यासाठी मुलांना शाळेत दर्जेदार पुस्तके देऊन त्यांचे वाचन घेण्यात आले उपस्थित मुलांचे स्वागत करण्यात आले वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात आले ग्रंथालयाच्या वतीने मुलांना खाऊ वाटप करण्यात आले मांडले.

# ढवळस जि.प.शाळेचे शिक्षक धनंजय लेंडवे यांचा निरोप समारंभ कार्यक्रम उत्साहात संपन्न



ढवळस(सचिन हेंबाडे):– मंगळवेढा तालुक्यातील ढवळस जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक श्री.धनंजय अशोक लेंडवे हे दि.१६/९/२०११ ते १६/५/२०२३ या कालावधीत सुमारे १२ वर्षामध्ये त्यांनी शाळेत ज्ञानदानाचे अतिशय उत्कृष्ट पद्धतीने काम केले आहे.त्यांच्या या १२ वर्षाच्या कालावधीत त्यांनी शाळा खडज नामांकन करण्यात आली.

शाळेतील इ.२ री पासून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षासाठी बसवून विद्यार्थ्यांना गुणवत्ता संपन्न केले. २०१८ साली शाळेतील विद्यार्थ्यांनी टॅलेंट हंट स्पेर्धेत ५ स्पर्धा प्रकारात जिल्ह्यात क्रमांक मिळविला. क्रिडास्पर्धेत दरवर्षी कबड्डी,लंगडी यामध्ये तालुका प्रथम क्रमांक मिळवून जिल्हा स्पर्धेपर्यत धडक असायची.

ढवळस शाळेत स्वच्छ सुंदर शाळा उपक्रम राबविला त्यामध्ये लोकसहभागातून शाळा रंग रंगोटी कामासाठी शाळेच्या माजी विद्यार्थ्यांकडून शाळेसाठी सुमारे २ लाख रुपये देणगी मिळविली.शाळा खोली दुरूस्तीसाठी कमीत–कमी मजुरीमध्ये कोरोना कालावधीत सुरेख काम करून ६ वर्गखोल्या दुरुस्त केल्या.

माझी शाळा माझा अभिमान या उक्तीप्रमाणे काम केल्यामुळे शाळेच्या व गावाच्या वैभवाच्या दृष्टीने शाळेचे महाराष्ट्र राज्य शासनाच्या आदर्श शाळा म्हणून मंगळवेढा तालुक्यामध्ये एकवेम ढवळस शाळेची निवड करण्यात आली आहे.

विविध उपक्रम राबवून विद्यार्थी गुणवत्ता संपन्न व विविध आदर्श पैलू विद्यार्थ्यांना देण्याचे पवित्र कार्य शिक्षक धनंजय लेंडवे यांनी केले.

गुणवत्ते बरोबर त्यांनी आदर्शवत वर्तनशील असणारे अनेक विद्यार्थी १२ वर्षात घडविले. मोठ्या शाळेत त्यांनी फक्त माझा– माझा वर्ग न पाहता माझी शाळा आगोदर व नंतर या शाळेतला माझा वर्ग याप्रमाणे शिस्तप्रिय विद्यार्थी घडविले. त्यांच्या बदलीमुळे विद्यार्थी तर धायमुख होऊन रडत होतेच तर मुख्या.सुर्यकांत जाधव,अध्यक्ष पंपूशेठ मोरे व बरेच माजी विद्यार्थी भावूक झाले होते.

अशा या आदर्श शाळेतील आदर्श शिक्षकांचा निरोप समारंभ कार्यक्रमानिमित्त गावचे सरपंच मा.सौ.रोहिणी हेंबाडे, घरनिकी केंद्रप्रमुख पुरुषोत्तम राठोड ,विस्तार अधिकारी मल्लिकार्जुन आनंदपुरे, माजी सरपंच डॉ. सिध्देश्वर मोरे, माजी सरपंच आबासाहेब मोरे,युवक नेते विश्वनाथ हेंबाडे, सेवानिरुत्त शिक्षक दत्तात्रय हेंबाडे,अध्यक्ष पंपूशेठ मोरे, गिरजाप्पा मस्के,मंगेश मोरे, आबासाहेब गायकवाड,अमोल मोरे,अमर मोरे,बालाजी मोरे,मधुकर हेंबाडे, दादासो मोरे,आदेश बावचे, शाळेचे मुख्याध्यापक सूर्यकांत जाधव, सहशिक्षक विजय गायकवाड,सुदर्शन शेजाळ,संभाजी सुळकुंडे,मोहन लेंडवे, शिक्षिका राजश्री माळी, मनिषा जगताप आदी यांच्या उपस्थित कार्यक्रम पार पडला.

# जेथे रस्ता तेथे लालपरी! ५ वर्षाच्या चिमुकल्यापासून ७५ वर्षांच्या ज्येष्ठांसाठी काय आहेत सवलती, नक्की वाचा



सोलापूर : 'जेथे रस्ता तेथे बस'अंतर्गत जिल्ह्यातील जवळपास आठशे गावांपर्यंत लालपरीची सेवा पोचली आहे. जिल्ह्यातील नऊ आगाराच्या माध्यमातून दररोज ६५० बसगाड्या विविध मार्गांवर धावत आहेत. दररोज जिल्ह्यातील सरासरी दोन लाख प्रवासी लालपरीतून प्रवास करतात. महिलांना प्रवासात ५० टक्के सवलत दिल्यानंतर दररोज ६५ ते ७० हजार महिला प्रवाशी वाढले आहेत. सवलतीच्या निर्णयानंतर ३३ टक्के महिला प्रवाशी वाढले आहेत.

जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाचे नऊ डेपो आहेत. सोलापूर, बार्शी, अकलूज, सांगोला, पंढरपूर, अक्कलकोट, मंगळवेढा व कुर्डुवाडी अशा डेपोंचा त्यात समावेश आहे. स्थानिक प्रवाशांसाठी सोलापूर विभागाच्या माध्यमातून पंढरपूर–सोलापूर, पंढरपूर–टेंभूर्णी, पंढरपूर–सांगोला, बार्शी–सोलापूर, मोहोळ–सोलापूर, सोलापूर–अक्कलकोट अशा शटल सेवा सुरु आहेत. स्थानिक प्रवाशांसाठी दररोज ३५० बसगाड्या रस्त्यांवर धावत आहेत.

सोलापूर विभागाअंतर्गत दररोज ६५७ बसगाड्या प्रवाशांची सेवा करीत आहेत. 'आरामदायी व सुखकारक प्रवास' हे एसटीचे ब्रिदवाक्य आहे. उन्हाळा असो वा हिवाळा, लालपरी वेळेनुसार गावोगावी पोचतेच. त्यामुळे दिवसेंदिवस आता लालपरीचे प्रवासी वाढत आहेत. 'वाट पाहिन पण लालपरीनेच जाईन' म्हणणाऱ्या महिलांची संख्या आता वाढली आहे. लालपरीच्या प्रवाशांची संख्या वाढीसाठी ठोस नियोजन केले जात असल्याची माहिती विभाग नियंत्रक विनोद भालेराव यांनी सांगितले.

'एसटी' बसगाड्यांमधील प्रवाशांसाठी सवलती...

– ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना बसमधून शंभर टक्के मोफत प्रवास

– महिलांना राज्यभरातील प्रवासासाठी प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत

– पाचवी ते बारावीपर्यंतच्या शालेय विद्यार्थीनींना मासिक पास मोफत

– ६५ ते ७५ वर्षांपर्यंतच्या ज्येष्ठ नागरिकांना तिकीट दरात ५० टक्के सवलत

– ५ ते १२ वर्षांपर्यंत चिमुकल्यांना एसटी प्रवासात अर्धेच तिकीट काढावे लागते

### पुढच्या महिन्यात सोलापूर–पुणे ई–बससेवा

सोलापूर ते पुणे या मार्गावर आगामी काही दिवसांत ईलेक्ट्रिक बससेवा सुरु होणार आहे. सोलापूर बस डेपोतील चार्जिंग स्टेशनचे काम आता पूर्ण झाले असून किरकोळ काम राहिले असून ते पूर्ण झाल्यानंतर ही बससेवा सुरु होणार आहे. त्यानंतर पंढरपूर–पुणे, मंगळवेढा–सोलापूर, मंगळवेढा–पुणे अशा मार्गांवरही ईलेक्ट्रिक बससेवा सुरु होणार आहे. इंधनाचे दर वाढल्याने त्यावर पर्याय म्हणून ईलेक्ट्रिक बससेवेकडे पाहिले जात आहे.

# 'उजनी' उणे ३४ टक्क्यांवर, उसाऐवजी मक्याची पेरणी; शेतकरी हताश



उजनी : जुलैचा अर्धा महिना संपला तरीही रुसलेला वरुणराजा बरसण्यास तयार नसल्याने आता पोशिंद्यावर दुष्काळाचे ढग दाटू लागले आहेत. तर दुसऱ्या बाजूने उजनी जलाशयाचा पाणीसाठा उणे ३४ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे भर पावसाळ्यात नगर, पुणे, सोलापूर जिल्ह्याला पाणी टंचाईच्या झळा बसू लागल्या आहेत.

हवामान खात्याच्या भरवशावर बसलेल्या आणि पूर्वनियोजन न करता उशिरा जागी झालेली प्रशासकीय व्यवस्था यामुळे आता उजनीचा पाणीसाठा राखीव करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

पुणे, नगर व सोलापूर या तीन जिल्ह्यांना उजनी धरण वरदान ठरले आहे. या उजनीवर पाण्याच्या जेवढ्या योजना आहेत त्यापेक्षा अधिक शेती व औद्योगीकरण अवलंबून आहे. गेल्या वर्षी उजनी धरण शंभर टक्के भरले, मात्र मार्च ते जुलै या पाच महिन्यांतच उजनीचा पाणीसाठा मायनस ३४.५४ टक्क्यांवर जाऊन पोचला आहे.

उजनीच्या पाणी वापरावर मर्यादाच नसल्याने दरवर्षी खऱ्या धरणग्रस्तांना पाण्यासाठी टाहो फोडावाच लागतो. यावर्षी तर उजनीची परिस्थिती फारच बिकट बनली आहे.

धरणग्रस्तांना उजनीच्या पाण्याचा मोठा आधार असतो; मात्र पाणलोट क्षेत्रात पाण्याचा थेंबही शिल्लक राहिला नाही. पळसदेव व टाकळी, केत्तूर, पारेवाडी भागापासून खालच्या भागात आता पाणी सरकले आहे.

आता उजनी मायनस ३४.५४ वर आल्याने व पाऊस साथ देत नसल्याने भविष्यात पाण्याचे मोठे संकट घोंगावताना दिसत आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देणे गरजेचे असल्याने आता शेती आणि औद्योगीकरणाचा पाणीपुरवठा बंद करण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. साहजिकच उजनीवर अवलंबून असलेला शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. असे असले तरी अजूनही औद्योगीकरण क्षेत्र पाणी वापरत असल्याचे धक्कादायक चित्र आहे.

संभाव्य पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेऊन औद्योगीकरणासाठी पाणी उचलण्यावर तत्काळ बंदी घालणे अतिशय गरजेचे बनले आहे.

सध्या पुणे खडकवासला धरण साखळी क्षेत्रात पावसाचा जोर नसल्याने ही धरणे खालावलेल्या अवस्थेत आहेत. उजनी धरण तर पुण्याच्या वरच्या भागावर व तेथील धरणे भरण्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे आडात नाही तर पोहऱ्यात कोठून येणार, अशी अवस्था उजनीची झाली आहे.

### 'उजनी' प्लसमध्ये केव्हा येणार?

उजनी धरण परिसरात पाऊस नसला तरी चालेल परंतु पुणे जिल्हा परिसर तसेच भीमा खोऱ्यातही पावसाचा रुसवा कायम असल्याने संकटात भरच पडली आहे. पुणे जिल्हा व परिसरात सुरवातीला पाऊस झाल्यानंतर १० हजार क्यूसेसने पाणी उजनी धरणात दाखल होत होते.

### 'त्या' दुष्काळाच्या पुनरावृत्तीची शक्यता

उन्हाळ्यात जिवाचे रान करून ऊस, डाळिंब, द्राक्ष, पेरू, केळी अशा फळबागा व तरकारी पिके जगवण्यात आली. मात्र या वर्षी अवकाळी पावसाने दडी मारली. त्यानंतर जून व जुलै महिना कोरडाच गेल्याने भेगाळलेली शेती व तग धरून उभा असलेल्या पिकांनी केव्हाच माना टाकल्या आहेत.

बहुतांश फळबागा, उसाचा पाचोळा झाला आहे. तरीही बळिराजा आजही मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहे. पाऊस होत नसल्याने गेल्या सहा–सात वर्षांपूर्वीच्या दुष्काळाची पुनरावृत्ती होते की काय, अशी भीती वाटू लागली आहे. दिवसरात्र शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. या भागात असलेले सर्व पाझर तलाव कोरडे पडले आहेत.परंतु सध्या पावसाने ब्रेक घेतल्याने पुणे जिल्हा व परिसरातील केवळ २०० क्यूसेस पाणीही उजनी जलाशयात दाखल होत नाही. हे असेच राहिले तर उजनी मायनसमधून प्लसमध्ये केव्हा येणार, हाही प्रश्न आहे.

# चिमणी पडून महिना लोटला, प्रत्यक्ष विमान काही उडेना



सोलापूर – बहुप्रतीक्षित अन् बहुचर्चित सोलापूरच्या विमानसेवेचं भवितव्य पुन्हा 'हवे'त असल्याची सध्याची तरी वास्तव स्थिती आहे. इथल्या विमानसेवेचा मार्ग पुन्हा अनेक अडथळ्यांची शर्यतीमधून जात आहे.

विमानेसेवेला अडथळा ठरणाऱ्या श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या वादग्रस्त चिमणीच्या पाडकामानंतर लगेच विमानसेवा सुरु होईल, या अपेक्षेला तिलांजली मिळत आहे. विमानतळ परिसरातील वीस एकरांवरील अतिक्रमणं अन् उच्च दाबाच्या वीज वाहक तारांच्या अडथळ्यांसह अन्य काही अडथळे विमानसेवा सुरु होण्याला आहेत.

दरम्यान, चिमणी पडून महिना लोटला, मात्र प्रत्यक्ष विमान उडणार कधी? हाच प्रश्न सोलापूरकरांच्या मनामधील आहे. तोच प्रश्न सध्या अनुत्तरीत राहात आहे. मुख्य अडथळा असणाऱ्या चिमणीच्या पाडकामानंतर अन्य अडथळे दूर करण्यासाठीच्या हालचाली प्रशासनाकडून सुरु आहेत.

> विमानसेवा सुरू करण्यासाठी जे काही अडथळे आहेत ते जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडले आहेत. अतिक्रमण हटविण्यासाठी महापालिका आयुक्तांकडे बैठक लावण्यात येणार आहे. सुरक्षित विमानसेवा सुरू करण्यासाठी अतिक्रमण हटविणे आवश्यक आहे.
> – बनोत चांपला, व्यवस्थापक, होटगी रोड विमानतळ, सोलापूर

सोलापूरचे हित पाहता विमानसेवेचा पहिल्यापासून आग्रह धरणाऱ्या सोलापूर विकास मंचचा सेवा सुरु होण्यासाठी पाठपुरावा सुरुच आहे. तथापि, विमानसेवेच्या मागणीला मूर्त स्वरूप येणं महत्त्वाचं आहे. इथल्या विमान लॅंडिंगचं भवितव्य पुन्हा हवेतच राहू नये, ही तमाम सोलापूरकरांची इच्छा आहे.

### भाजपनं आता पेलावं आव्हान

होटगी रोड विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्याचे भाजपसमोर मोठे आव्हान उभे आहे. चिमणी पाडल्यानंतर कामगार आणि शेतकरी वर्ग नाराज झाला आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत निर्णायक ठरणारा लिंगायत समाज यामुळे दुखावला गेला आहे. त्यात विमानसेवा सुरू न झाल्यास इतर वर्गही नाराज होणार आहे. त्यामुळे उड्डाण योजनेंतर्गत सोलापुरातून विमानसेवा सुरू करण्याचे आव्हान भाजपसमोर उभे आहे. तथापि, विमानसेवा चालू करण्यासंदर्भात भाजपनं सक्षमपणे आव्हान पेलून इथली विमानसेवा सुरु करायला हवी.

उड्डाण योजनेंतर्गत विमानसेवा सुरू करण्यासाठी खासदार जयसिद्धेश्वर शिवाचार्य हे केंद्रीय उड्डाणमंत्र्यांसोबत चर्चा करणार आहेत. मात्र, प्रत्यक्षात विमानसेवा कधी सुरू होणार? याबाबतचे उत्तर सध्या तरी ठोसपणे कोणाकडे नाही.

सोलापूरच्या औद्योगिक पिछाडीला विमान सेवा सुरु नसण्याचे मुख्य कारण आहे. विमानसेवेअभावी गेल्या १५ वर्षात मोठे उद्योग सोलापुरात आले नाहीत. परिणामी येथे बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाला. सर्वच क्षेत्रामधील गुंतवणुकीला मर्यादा राहिल्या. सोलापूरच्या एकूण विकासाला खीळ बसली.

या सगळ्या पार्श्वभूमीवर, सोलापूरची विमानसेवा चालू व्हायला पाहिजे, अशी आग्रही भूमिका सोलापूर विकास मंचने सुरवातीपासून घेतली. सोलापूरकरांना सोबत घेऊन आपला लढा अखंडपणे चालू ठेवला. विमानसेवेला अडथळा ठरणाऱ्या चिमणीच्या पाडकामासाठी मंचने दिलेला लढा तर खूप मोठा होता.

या लढ्याला यश मिळाले. चिमणीच्या पाडकामानंतर इथली विमानसेवा चालू होण्यासाठी मंचचे संबंधित सर्व यंत्रणांच्या प्रमुखांना, संबंधितांना निवेदने देण्याचा 'सिलसिला' ठेवला.

विमानसेवेसाठी सातत्याने कैक वर्षाचा पाठपुरावा ठेवण्याचे औदार्य आपल्या सोलापूरसाठी मंचने दाखविले आहे. हे कौतुकास्पद आहेच. विमानसेवेसाठी त्यांच्या लढण्याला, झगडण्याला, प्रामाणिक प्रयत्नांना यश मिळायला हवं बस्स इतकंच.

# प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशासाठी पहिल्या कॅप राउंडचे ऑप्शन फॉर्म २० जुलै पासून सुरू

## स्वेरीकडून विविध ठिकाणी ऑप्शन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा

पंढरपूर: 'प्रथम वर्ष अभियांत्रिकी (पदवी) प्रवेशासाठी पहिल्या फेरीचे (कॅप राउंड-१) ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया गुरुवार, दि.२० जुलै २०२३ पासून सुरु होत असून ती शनिवार दि. २२ जुलै पर्यंत चालणार आहे. या पहिल्या कॅप राउंड मधून विद्यार्थी हवे ते महाविद्यालय आणि पसंतीची शाखा मिळवण्यासाठी प्रयत्न करू शकणार आहेत. विद्यार्थी व पालकांनी महाविद्यालय आणि शाखा निवडण्यासाठी संबंधित महाविद्यालयातील प्लेसमेंट, वार्षिक परीक्षांचे निकाल, प्रत्येक वर्षी होणारी विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग, वसतिगृह सुविधा, इतर सोयी सुविधा, इन्फ्रास्ट्रक्चर, मिळालेली मानांकने, विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने आवश्यक असणारे संशोधनाचे वातावरण या सर्व बाबी प्रामुख्याने पहाव्यात आणि मगच महाविद्यालय निवडावे. 'विद्यार्थ्यांनी पहिल्या फेरीत महाविद्यालयांची नावे काळजीपूर्वक भरणे आवश्यक असते. पालक व विद्यार्थ्यांचा नाहक प्रवास खर्च व वेळ वाचावा तसेच विद्यार्थी व पालकांना अचूक पद्धतीने हे फॉर्म्स भरता यावेत या हेतूने स्वेरीच्या वतीने विविध ठिकाणी मोफत फॉर्म भरण्यासाठी सेंटर स्थापित करण्यात आलेली आहेत. त्या सेंटर्स चा विद्यार्थी व पालकांनी लाभ घ्यावा.' असे आवाहन स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशासाठी कॅप राऊंड-१चे ऑनलाइन फॉर्म भरण्याची प्रक्रिया गुरुवार, दि.२० जुलै २०२३ पासून ते शनिवार दि. २२ जुलै, २०२३ पर्यंत चालणार आहे. स्वेरी अभियांत्रिकीचा इन्स्टिट्यूट चॉईस कोड इ. एन.-६२२० हा आहे. विद्यार्थ्यांनी ऑप्शन फॉर्म भरण्यासाठी सांगोला (आर.बी.पवार- ९६६५२२७५८५, व्ही.एम.साळे- ९१७५७९९४८०), बार्शी (पी.बी.भागानगरे- ९७६६२२३५२२, एस.एस.गायकवाड -८९७२८०००७८), कुर्डुवाडी (एस.सी.हलकुडे- ९८५०२४२१५५, एम. एम. आवताडे- ८३२९३९०८१७), धाराशिव (ए.ए.गरड- ९२८४७०६०२७, एस.ए.गरड-८२०८६२०७१८), लोहारा(ए.ए.शिंदे-८६६८४१६५५९, जे.एल.मुसळे- ९३५९२५०५१३), वैराग (एच. आर. पवार ८२०८४४८५९२), करमाळा (बी. टी. गडदे- ८२०८२६२११३, पी.डी.माने-७०२०६०६७७९), माढा (डी.टी.काशीद - ८२०८७२४२६६, ए. के पारखे-९५०३६३२६२२), टेंभुर्णी (एम.एस. सुरवसे- ८८०६६६०५३७, एस.डी.इंदलकर-९६६५६४०६४२), मंगळवेढा (पी.बी.आसबे- ७८२१००४६४७, के.एस.पुकाळे -७७७६०७०९१३), अकलूज (सी.सी.जाधव- ८३०८६८९५७०, वाय. बी. सुरवसे- ८६००८५५०२३), अक्कलकोट (जे. के. कोष्टी- ९५८८४९२१२०, एस.डी.कोल्हे- ९७६७१३२८४८), जत (एस. एम. शिंदे- ९४०३७५१०३९, एच.एच. मल्लाड- ९९७५६२३८७५), महूद (व्ही.ए.सावंत- ७७०९३२२०७३, व्ही.व्ही.राजमाने- ९०६७२८७७६७), करकंब (एस. जी. जाधव- ९७६४३५४८०९, एस. एम. काळे-९९६०११८५८०), मोहोळ (आर. एस. साठे- ७७०९९४१४८२, पी. पी. चव्हाण -८४४६४०४६०९), आटपाडी (ए.बी. कोकरे- ९७६६१२९१६९), उ. सोलापूर (ए. एस.ढवळे -८३८००५०५६०) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंगच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील (९५९५९२११५४) व प्रा.उत्तम अनुसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांच्या नेतृत्वाखाली उच्चशिक्षित प्राध्यापकांच्या सहकार्याने तसेच अभियांत्रिकीला सातत्याने मिळत असलेल्या अभूतपूर्व यशाच्या पार्श्वभूमीवर या पहिल्या कॅप राउंडला देखील नेहमीप्रमाणे विक्रमी गर्दी होणार, हे निश्चित.

# आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत अंकोली च्या भैरवनाथ विद्यालयाचे चार विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत






अंकोली (दशरथ रणदिवे ):- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत अंकोली च्या भैरवनाथ विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी भरघोस यश मिळवून जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान पटकविले आहे. आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत अंकोली येथील भैरवनाथ विद्यालयातील २९ विदयार्थी या परीक्षेस बसविले होते. त्यापैकी १६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर चार विद्यार्थी शिष्यवृतती धारक झाले. यामध्ये सुरज प्रभाकर गरड याने ३०२ पैकी २१२, सृष्टी दशरथ रणदिवे हिने २०२, उमे आयमन जमीर मुलाणी हिने २०० तर पृथ्वीराज अशोक सुरवसे याने १८८ गुण मिळवले आहेत. त्यांना हे यश मिळविण्यासाठी विभागप्रमुख हनुमंत राऊत (गणित व बुद्धिमत्ता ), सागर पाटील (मराठी ), अण्णासाहेब लेंडवे (इंग्रजी )यांचे मार्गदर्शन लाभले. या त्यांच्या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, माजी चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव विकास देशमुख, विभागीय चेअरमन संजीव पाटील, सह सचिव बी. एन. पवार, विभागीय अधिकारी राजेंद्र साळुंखे, स्थानिक स्कुल कमेटीचे सदस्य बाबासाहेब क्षीरसागर, सज्जन पवार, संग्रामसिह पवार, निवृत्त पोलीस अधिकारी दत्तात्रय कामतकर, सरपंच पांडुरंग येळवे, शेजबाभुळगावचे नागराज पाटील, प्राचार्य संजय जोशी व पर्यवेक्षक डी. के. देशमुख यांनी अभिनंदन केले.

# सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे येथील शासनमान्य सुविधा केंद्रावर एम.फार्मसी प्रवेशासाठी मोफत मार्गदर्शन केंद्र व ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु

## ऑनलाईन अर्ज दिनांक १७/०७/२०२३ ते २६/०७/२०२३दरम्यान स्वीकारले जाणार आहेत



सांगोला (प्रतिनिधी):- इ.स.२००५ ची स्थापना असलेल्या सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी,मेथवडे येथे औषधनिर्माणशास्त्र पदविका (डी.फार्मसी), पदवी(बी.फार्मसी) व पदव्युत्तर (एम.फार्मसी-फार्मासुटिकल केमिस्ट्री) अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी येथील एम.फार्मसी अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया अर्ज सुविधा केंद्र (फॅसिलिटेशन सेंटर) म्हणून महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी मिळाली आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी दिली.या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता एम .फार्मसी (फार्मासुटिकल केमिस्ट्री) प्रवेश बाबत मोफत मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले आहे.या केंद्रामध्ये प्रवेशप्रक्रियेसाठी लागणारे गुणपत्रके,प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे व संपूर्ण प्रवेशप्रक्रिया या बदल सखोल माहिती विद्यार्थी व पालकांना देण्यात येणार आहे.या प्रवेशप्रक्रियेसाठी व अर्ज पडताळणीसाठी विद्यार्थ्यांसमोर दोन पर्याय ठेवले आहेत. त्यामध्ये

१) प्रथम पर्यायामध्ये सुविधा केंद्रावर जाऊन अर्ज भरणे,पडताळणी व निश्चिती करणे.

२) दुसऱ्या पर्यायामध्ये विद्यार्थी महाविद्यालयास (अर्ज सुविधा केंद्र ( एफ.सी सेन्टर )) न जाता इंटरनेटचा वापर करून सुविधा केंद्र निवडणे व पडताळणी व निश्चिती करणे.

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी या सुविधा केंद्रामध्ये बी.फार्मसी उत्तीर्ण व जीपॅट परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांनी एम.फार्मसी पदव्युत्तर ऑनलाईन अर्ज / रजिस्ट्रेशन करण्यासाठी https://mpharm2023.mahacet.org.in/ या संकेतस्थळाचा वापर करायचा आहे. सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी या सुविधा केंद्रामध्ये विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन व मूळ कागदपत्रे पडताळणी,अर्ज निश्चिती होणार आहे.तरी विद्यार्थ्यांनी सुविधा केंद्रावर येताना आपले सर्व ओरिजिनल कागदपत्रे व दोन प्रति त्याच्या झेरॉक्स सेट सोबत घेऊन येणे.खुला प्रवर्गासाठी १००० रुपये तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ८०० रुपये प्रवेश प्रक्रिया शुल्क ऑनलाईन नेट बँकिंग द्वारे किंवा एटीएम कार्ड द्वारे महाराष्ट्र शासनाकडे भरणा करायचा आहे.तरी फॉर्म भरण्यासाठी सुविधा केंद्रावर येताना एटीएम कार्ड घेऊन येणे.ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत पालक व विद्यार्थ्यांच्या असणाऱ्या विविध शंका व अडचणी याबाबत मोफत सखोल मार्गदर्शन या महाविद्यालयातील अनुभवी व तज्ञ प्राध्यापकांमार्फत उपलब्ध होणार आहे.तरी सर्व विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले सर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी केले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी प्रा.एस.एस.काळे (९८२२०४७२३६), डॉ.ए.एम.तांबोळी (९९७५४०२४६५), डॉ.एम.जी.शिंदे (८३०८४८७२७८) व श्री.पी.एस.लोखंडे (९८२३१०७३७१) यांच्याशी संपर्क करावा. प्रथम वर्ष एम.फार्मसी प्रवेश प्रक्रिया संक्षिप्त वेळापत्रक खालील प्रमाणे:

१ अंतिम मेरिट लिस्ट ०५/०८/२०२३

२. प्रथम प्रवेश फेरीसाठी ऑपशन फॉर्म भरणे ०६ /०८ /२०२३ ते ०८ /०८ /२०२३

३. प्रथम प्रवेश फेरी लिस्ट ०९ /० ८ /२०२३

४. प्रथम फेरीत नंबर लागलेल्या कॉलेजच्या प्रवेशासाठी अर्जदार विद्यार्थ्यांनी करावयाची प्रक्रिया १०/०८/२०२३ ते १२ /०८/२०२३

५. दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी ऑपशन फॉर्म भरणे १६ /०८/२०२३ ते १८/०८/२०२३

६. दुसरी प्रवेश फेरी लिस्ट १९/०८/२०२३

७. दुसऱ्या फेरीत नंबर लागलेल्या अर्जदार विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या प्रवेशासाठी करावयाची प्रक्रिया २१/०८/२०२३ ते २३/०८/२०२३

८.तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी ऑपशन फॉर्म भरणे २५ /०८/२०२३ ते २७/०८/२०२३

९. तिसरी प्रवेश फेरी लिस्ट २८ /०८/२०२३

१०. तिसऱ्या फेरीत नंबर लागलेल्या अर्जदार विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या प्रवेशासाठी करावयाची प्रक्रिया २९/०८/२०२३ ते ३१/०८/२०२३

११. कट ऑफ डेट ०६/०९ /२०२३

# सांगोला येथील दत्त मंदिरातून अधिक मास दिंडीस प्रारंभ

सांगोला - दर तेहेतीस महिन्यानंतर येणारा अधिक महिना या.वर्षी येत असून त्याची सुरुवात काल मंगळवर दिनांक १८ जुलै पासून झाली. अधिक महिना हा धार्मिक व अध्यात्मिक दृष्टीने पवित्र व महतवाचा मानला गेला आहे.या महिन्यात परमेश्वराचे मनन, चिंतन, भजन, वाचन, पाठ, पूजा याला महत्व दिले.असून दान.देण्यास महत्व दिले गेले आहे.

सांगोला शहरातील महादेव गल्ली हो अध्यात्मिक राजधानी म्हणून ओळखली जात असून या परिसरात महादेव मंदिरं सह श्री दत्तात्रय, श्री गणेश, श्रीराम, हनुमान, मारुती, शनी, व्यंकटेश,श्री नाथ यासह अनेक देवतांची मंदिरे आहेत.त्यामुळे या परिसरात नेहमी काही ना काही धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.त्याचाच एक भाग म्हणून प्रत्येक अधिक महिन्यात.श्री दत्त मंदिरातून अधिक मास दिंडी म्हणजेच नगर प्रदक्षिनेचे आयोजन केले जाते.त्यानुसार काल मंगळवारी ह भ प दत्तदेव वांगीकर व श्रीपाद वांगीकर यांचे मार्गर्शनाखाली पुरुष व महिलांच्या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. राम नामाचा. व प्रभूनामाचा गजर करीत दिंडी मार्गस्थ झाली. श्री दत्त मंदिरातून निघालेली दिंडी देशपांडे गल्ली विठोबा मंदिर , कोष्टी गल्ली विठ्ठल मंदिर , चौंडे श्वरी मंदिर, मेन रोड सिद्धनाथ मंदिर , शिवाजी चौक, मारुती मंदिर, खंडोबा मंदिर, शनी मंदिर, महादेव मंदिर, श्रीराम मंदिर मार्गे दत्त मंदिरात पोहोचली.भजनासाठी पखवाज साथ श्रीपाद वांगीकर , सारंग वांगीकर व वीणा धारक म्हणून मल्हार कुलकर्णी ना मान देण्यात आला.

आरती, भजन, जागर यामुळे दत्त मंदिर व परिसर भक्तिभावाने भरून गेला होता. कार्यक्रम यशवी करण्यासाठी ह. भ प सुभाष लवुळकर , नंदकुमार लवूलकर ,वल्लभ लवूलकर , अमोल लबुळकर यांचे सह सर्व लवुलकर परिवार व भाविक भक्तांनी परिश्रम घेतले. यावेळी तीस हून अधिक पुरुष भक्त व वीस हून अधिक महिला उपस्थित होत्या.

# श्री गुरुकुल विद्यापीठ राजुरी चे स्कॉलरशिप परीक्षेत दैदिप्यमान यश

राजुरी (वार्ताहर):- राजुरी ता.सांगोला येथील श्री.गुरुकुल विद्यापीठ व ज्युनिअर कॉलेज, राजुरी या प्रशालेतील १८ विद्यार्थी स्कॉलरशिप परीक्षेच्या गुणवत्ता यादीत झळकले. इ.८ वी चा वैभव मेटे (२७२) राज्य गुणवत्ता यादीत ११ वा व सोहम खिलारे (२६८) राज्य गुणवत्ता यादीत १५ वा आला आहे. तसेच अभिनंदन गायकवाड (२२४) प्रज्योत जाधव (२२२) तात्यासो खांडेकर (२१०) सिद्धनाथ कुपाडे (२०८) साक्षी चव्हाण (२०४) प्रणव कांबळे (१९६) गौरी बाबर (१८८) ओमसिंह पाटील (१८८) हर्षद बाबर (१८६) अथर्व शिंदे (१८४) हे शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. तसेच इतर १२ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.इ.५ वी चे विद्यार्थी श्रेयश नरळे (२६२) गणेश बाबर (२४८) अभंग लवटे (२४२) श्रावणी बजबळे (२३२) पृथ्वीराज विभुते (२२८) स्वयम घाडगे (२२०) हे शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. तसेच इतर २६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. एकूण ५६ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी ठरले आहेत. सर्व विद्यार्थ्यांना श्री.शिंदे सर, श्री दिघे सर, सौ.घाडगे मॅडम, सौ.आदट मॅडम, श्री.केंगार सर, गुरव मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले

दैदिप्यमान यशाबद्दल गुरुकुल चे संस्थापक अध्यक्ष श्री.महादेव बाड , संस्था सचिव सौ.शिरमा बाड , प्राचार्य श्री.एम.एन.नरळे सर, पर्यवेक्षक श्री.बंडगर सर यांनी गुणवंतांचे अभिनंदन केले.

ग्राहकांची आवड, वेळेची गरज, आधुनिक तंत्रज्ञान, कलात्मक दृष्टी यातून साकारलेली मुद्रणाची सृष्टी
सांगोला शहरातील एक अग्रही नाव
वैभव ऑफसेट
All Printing Solutions...
लग्नपत्रिकेचे भव्य दालन
हॉस्पिटल व ऑफिस फाईल्स व स्टेशनरी, पॉम्प्लेट, कॅलेंडर, अहवाल, बिलबुक, व्हिजीटींग कार्ड, लेटर हेड
वेळेत, सुबक, अचुक, योग्य दरात प्रिंटींगसाठी
४२२, मेन रोड, मारुती मंदिरासमोर, सांगोला जि.सोलापूर ४१३ ३०७
मो. ९९२३७७२२९५, ९०२८५७१११०
Email :vaibhavoffset01@gmail.com

सर्व सुखसोयींनी युक्त
१ बी एच के फ्लॅट
भाड्याने देणे आहे
फोन ९४२३३३५४२३

दैनिक सांगोला सुपरफास्ट
या लोकप्रिय दैनिकासाठी
विभागवार प्रतिनिधी नेमने आहे.
कोळा, जूनोनी, माहुद,जवळा घेरडी, संगेवाडी, सांगोला
इच्छुक व्यक्तींनी संपर्क साधावा.
मो.९९२१४०४०९५

व्यवसाय तुमचा, जाहिरात आमची
100% यशाची हमी
कमी रेट मध्ये मिळवा प्रसिध्दी तालुकाभर
ऑनलाईन पेपर साठी जाहिरात स्विकारल्या जातील.
तुमच्या व्यवसायाची जाहिरात करा
दै.सांगोला सुपरफास्ट
च्या माध्यमातून लाखो लोकांच्या
Whats-app 9921404095